भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# माल-विक्रय अधिनियम, १९३०

(१९३० चा अधिनियम क्रमांक ३)

[५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

# The Sale of Goods Act, 1930

(Act No. 3 of 1930)

[As in force on the 5th December 1991]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९९३
[किंमत : रुपये ४.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला माल विक्रय अधिनियम, १९३० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक २ दिनांक ७ जानेवारी १९९२ यात पृष्ठ १२५ ते १३७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ७ जानेवारी १९९२.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the The Sale of Goods Act, 1930 as on the 5th December 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 3, dated 7th January 1992 on pages 125 to 137.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 7th January 1992.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

# माल विक्रय अधिनियम, १९३०

## कलमांचा क्रम

कलमे.


### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. १८७२ चा अधिनियम ९ यांचे उपबंध लागू असणे.

### प्रकरण २ रे

### संविदेची घडण

४. विक्रय आणि विक्रयाचा करार.
संविदेचे उपचार.
५. विक्रयाची संविदा कशी केली जाते.
संविदेची विषय वस्तू.
६. विद्यमान किंवा भावी माल.
७. संविदा करण्यापूर्वी माल नष्ट होणे.
८. विक्रयापूर्वी पण विक्रयाच्या करारानंतर माल नष्ट होणे.
किंमत.
९. किंमतीची विनिश्चिती.
१०. अनुमूल्यन विक्रय करार.
शर्ती व प्राश्वासने.
११. वेळेबाबतचे विबंध.
१२. शर्त व प्राश्वासन.
१३. शर्त केव्हा प्राश्वासन म्हणून समजावयाची.
१४. हक्क, इत्यादींबाबतचे उपलक्षित अभिवचन.
१५. वर्णनानुसारी विक्रय.
१६. प्रत किंवा योग्यता याबाबत उपलक्षित शर्ती.
१७. नमुनानुसारी विक्रय.

### प्रकरण ३ रे

### संविदेचे परिणाम

१८. माल विनिश्चित असला पाहिजे.
१९. मालकी हक्क जेव्हा संक्रमित व्हावा असा उद्देश असेल तेव्हा तो संक्रमित होतो.
२०. सुपूर्दगीयोग्य स्थितीतील विनिर्दिष्ट माल.
२१. विनिर्दिष्ट माल सुपूर्दगीयोग्य स्थितीत आणणे.
२२. सुपूर्दगीयोग्य स्थितीतील विनिर्दिष्ट मालकिंमत विनिश्चित करण्यासाठी विक्रेत्याने त्याच्या बाबतीत एखादी गोष्ट करावयाची असेल तेव्हा.
२३. अविनिश्चित मालाचा विक्रय आणि विनियोजन.
२३. (२) परिवाहकास सुपूर्दगी.
२४. जांगडबोलीवर किंवा 'विक्रय वा परतीच्या बोलीवर' पाठवलेला माल.
२५. विल्हेवाटीचा अधिकार राखून ठेवणे.
२६. जोखीम सकृतदर्शनी मालकी हक्काबरोबर संक्रमित होते.
हक्कांचे हस्तांतरण.
२७. मालक नसलेल्या व्यक्तींकडून विक्रय.
२८. संयुक्त मालकांपैकी एकाकडून विक्रय.
२९. शून्यकरणीय संविदेखाली कब्जा असलेल्या व्यक्तीकडून विक्रय.
३०. विक्रयानंतर विक्रेता किंवा क्रेता यांच्याकडे कब्जा राहणे.

## प्रकरण ४ थे

### संविदेचे पालन


३१. विक्रेता आणि क्रेता यांची कर्तव्ये.
३२. किंमत देणे आणि सुपूर्दगी करणे या समवर्ती शर्ती आहेत.
३३. सुपूर्दगी.
३४. अंशतः सुपूर्दगीचा परिणाम.
३५. क्रेत्याने सुपूर्दगीकरिता आवेदन करणे.
३६. सुपूर्दगीबाबत नियम.
३७. चुकीच्या परिमाणात सुपूर्दगी.
३८. हप्त्याहप्त्याने सुपूर्दगी.
३९. परिवाहकास किंवा मालधक्कावाल्यास सुपूर्दगी.
४०. माल दूरच्या ठिकाणी सुपूर्द करण्यात येतो त्याबाबतीतील जोखीम.
४१. मालाची तपासणी करण्याचा क्रेत्याचा अधिकार.
४२. स्वीकार.
४३. नाकारलेला माल परत करण्यास क्रेता बांधलेला नाही.
४४. मालाची सुपूर्दगी स्वीकारण्याबाबत उपेक्षा केल्याबद्दल किंवा त्यास नकार दिल्याबद्दल क्रेत्याचे दायित्व.


## प्रकरण ५ वे

### अप्राप्त मूल्य विक्रेत्याचे मालाच्या बाबतीतील अधिकार


४५. "अप्राप्तमूल्य विक्रेता" याची व्याख्या.
४६. अप्राप्तमूल्य विक्रेत्याचे अधिकार.
अप्राप्तमूल्य विक्रेत्याचा धारणधिकार.
४७. विक्रेत्याचा धारणधिकार.
४८. अंशतः सुपूर्दगी.
४९. धारणधिकारचे समापन.
मार्गक्रमणात अटकाव.
५०. मार्गक्रमणात अटकाव करण्याचा अधिकार.
५१. मार्गक्रमणाचा अवधी.
५२. मार्गक्रमणात अटकाव कसा घडवून आणला जातो.
क्रेता आणि विक्रेता यांच्याकडून हस्तांतरण.
५३. क्रेत्याने केलेल्या पोटविक्रयाचा किंवा तारणाचा परिणाम.
५४. धारणाधिकाराने किंवा मार्गक्रमणात अटकाव करण्याने विक्रय सर्वसाधारणपणे विखंडित होत नाही.


## प्रकरण ६ वे

### संविदाभंगाबद्दल दावे


५५. किमतीसाठी दावा.
५६. अस्वीकाराबद्दल नुकसानी.
५७. सुपूर्दगी न केल्याबद्दल नुकसानी.
५८. विनिर्दिष्ट पालन.
५९. प्राश्वासनाच्या भंगाबद्दल उपाय.
६०. नियत दिनांकापूर्वी संविदेचा प्रत्यादेश.
६१. नुकसानीच्या रूपाने व्याज व विशेष नुकसानी.


## प्रकरण ७

### संकीर्ण


६२. उपलक्षित अटी व शर्ती वगळणे.
६३. वाजवी अवधी हा वस्तुस्थितीविषयक प्रश्न.
६४. लिलाव विक्रय.
६४क. विक्रय संविदामध्ये वाढलेल्या किंवा घटविलेल्या करांची रक्कम मिळवावयाची किंवा वजा करावयाची.
६६. व्यावृत्ती.

# माल-विक्रय अधिनियम, १९३०

## (१९३० चा अधिनियम क्रमांक ३)[1]

[१५ मार्च १९३०]

**माल-विक्रयासंबंधीचा कायदा निश्चित व विशोधित करण्यासाठी अधिनियम**

(५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान)

ज्याअर्थी, माल-विक्रयासंबंधीचा कायदा निश्चित व विशोधित करणे समयोचित आहे ; त्याअर्थी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

प्रकरण १ ले

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास [2]'* * * माल-विक्रय अधिनियम, १९३०' असे म्हणता येईल.
[3][ (२) त्याचा [4]विस्तार [5][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतभर आहे.]
(३) तो १ जुलै, १९३० रोजी अंमलात येईल.

**व्याख्या**

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसल्यास,—

(१) "क्रेता" याचा अर्थ, जी व्यक्ती माल विकत घेते किंवा विकत घेण्याचा करार करते ती व्यक्ती असा आहे ;

(२) "सुपूर्दगी" याचा अर्थ, एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे कब्जाचे स्वेच्छापूर्वक हस्तांतरण असा आहे ;

(३) माल जेव्हा अशा स्थितीत असतो की, त्याची सुपूर्दगी घेण्यास क्रेता संविदेखाली बांधलेला राहील, तेव्हा तो "सुपूर्दगीयोग्य स्थितीत" असल्याचे म्हटले जाते ;

(४) "मालाचा हक्कलेख" यात भरणपत्र, गोदी-अधिपत्र, वखारपालाचे प्रमाणपत्र, माल धक्कावाल्याचे प्रमाणपत्र, रेल्वे-पावती, मालाच्या सुपूर्दगीचे अधिपत्र किंवा आदेश आणि धंद्याच्या सामान्यक्रमात मालाच्या कब्जाचा किंवा नियंत्रणाचा पुरावा म्हणून वापरला जाणारा, अथवा त्याद्वारे दर्शविलेला माल हस्तांतरित करण्यात किंवा तो स्वीकारण्यास दस्तऐवजाच्या कब्जेदारास पृष्ठांकनाद्वारे किंवा सुपूर्दगीद्वारे प्राधिकृत करणारा किंवा प्राधिकृत करण्यासाठी म्हणून केलेला अन्य कोणताही दस्तऐवज यांचा समावेश आहे ;

(५) "दोष" याचा अर्थ, गैरकृत्य किंवा कसूर असा आहे ;

(६) "भावी माल" याचा अर्थ, विक्रयाची संविदा केल्यानंतर विक्रेत्याने निर्माण किंवा उत्पादन किंवा संपादन करावयाचा माल असा आहे ;

(७) "माल" याचा अर्थ, कारवाईयोग्य मागणीहक्क व पैसा यांहून अन्य प्रत्येक प्रकारची जंगम संपत्ती असा आहे ; आणि त्यात पुंजरोखा व शेअर्स, वाढती पिके, गवत आणि भूमीशी संलग्न किंवा तिचा भाग असलेल्या ज्या वस्तू विक्रयापूर्वी किंवा विक्रयाच्या संविदेअन्वये अलग करण्याचा करार करण्यात आला आहे त्या वस्तुचा समावेश आहे ;

(८) जिने धंद्याच्या सामान्य क्रमानुसार आपली ऋणे फेडण्याचे थांबवले आहे किंवा जी आपली ऋणे जसजशी देय होतील तसतशी फेडू शकत नाही त्या व्यक्तीस—मग तिने दिवाळखोरीचे कृत्य केलेले असो वा नसो,—"दिवाळखोर" असे म्हटले जाते ;

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन याकरिता आणि विशेष समितीच्या अहवालाकरिता पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९२९, भाग ५ वा, पृ. १६२; प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९३०, भाग ५ वा, पृ १.

२. १९६३ चा अधिनियम ३३ याच्या कलम २ द्वारे "भारतीय" हा शब्द गाळला.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे मूळ पोटकलमाऐवजी घातले.

४. हा अधिनियम १९४१ च्या अधिनियम ४ द्वारे वऱ्हाडला आणि १९६८ चा अधिनियम २६ कलम ३, अनुसूचीच्या भाग एक द्वारे पाँडिचेरीला लागू करण्यात आला आहे.

५. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" याऐवजी घातले.

(९) "व्यापारी अभिकर्ता" याचा अर्थ, धंद्याच्या रूढ क्रमानुसार असा अभिकर्ता म्हणून माल विकण्याचा किंवा विक्रीच्या प्रयोजनासाठी माल स्वाधीन करण्याचा, किंवा माल विकत घेण्याचा किंवा मालाच्या प्रतिभूतीवर पैसा उभारण्याचा प्राधिकार असलेला व्यापारी अभिकर्ता असा आहे ;

(१०) "किंमत" याचा अर्थ, माल-विक्रयाचे पैसारूप प्रतिफल असा आहे ;

(११) "मालकीहक्क" याचा अर्थ, मालातील सर्वसाधारण मालकीहक्क असा आहे, केवळ विशेष मालकीहक्क असा नाही ;

(१२) "मालाची प्रत" यात त्याची स्थिती किंवा अवस्था यांचा समावेश आहे ;

(१३) "विक्रेता" याचा अर्थ, जी व्यक्ती मालाचा विक्रय करते किंवा विक्रय करण्याचा करार करते ती व्यक्ती असा आहे ;

(१४) "विनिर्दिष्ट माल" याचा अर्थ, विक्रयाची संविदा करण्यात आली त्यावेळी निश्चित झालेला व संमत झालेला माल असा आहे ; आणि

(१५) या अधिनियमात वापरलेल्या पण त्यात व्याख्या न केलेल्या आणि "भारतीय संविदा अधिनियम, १८७२" (१८७२ चा ९) यात व्याख्या केलेल्या शब्दप्रयोगांना त्या अधिनियमात ठरवून दिलेले अर्थ आहेत.

१८७२ चा अधिनियम ९ याचे उपबंध लागू असणे. ३. "भारतीय संविदा अधिनियम, १८७२" (१८७२ चा ९) याचे अनिरसित उपबंध, या अधिनियमाच्या व्यक्त उपबंधाशी ते विसंगत असतील तेवढी मर्यादा खेरीजकरून, माल-विक्रयाच्या संविदांना लागू असण्याचे चालू राहील.

## प्रकरण २ रे

## संविदेची घडण

### विक्रयाची संविदा

विक्रय आणि विक्रयाचा करार. ४. (१) माल-विक्रयाची संविदा ही, विक्रेता जिच्याद्वारे मालातील मालकीहक्क क्रेत्यास काही किमतीस हस्तांतरित करतो किंवा हस्तांतरित करण्याचा करार करतो ती संविदा होय. अंश-मालकांमध्ये परस्परांत विक्रयाची संविदा होऊ शकेल.

(२) विक्रयाची संविदा बिनशर्त किंवा सशर्त असू शकेल.

(३) जेथे विक्रयाच्या संविदेखाली मालातील मालकीहक्क विक्रेत्याकडून क्रेत्याकडे हस्तांतरित करण्यात येतो तेथे त्या संविदेस "विक्रय/विक्री" असे म्हणतात, पण मालातील मालकीहक्क हस्तांतरण एखाद्या भविष्यकालीन वेळी, अथवा, मागाहून पूर्ण करावयाच्या एखाद्या शर्तीच्या अधीनतेने व्हावयाचे असते तेथे, त्या संविदेस "विक्रयाचा/विक्रीचा करार" असे म्हणतात.

(४) विक्रयाचा करार हा, जेव्हा तो काळ लोटतो किंवा ज्या शर्तींच्या अधीनतेने मालातील मालकीहक्क हस्तांतरित व्हावयाचा असेल त्या पूर्ण होतात तेव्हा विक्रयात रूपांतरित होतो.

### संविदेचे उपचार

विक्रयाची संविदा कशी केली जाते. ५. (१) माल काही किमतीस विकत घेण्याचा किंवा विकण्याचा प्रस्ताव आणि अशा प्रस्तावाचा स्वीकार, याद्वारे विक्रयाची संविदा केली जाते. त्या संविदेत मालाची तात्काळ सुपुर्दगी किंवा किमतीचे तात्काळ प्रदान करण्याबाबत किंवा या दोन्हींबाबत अथवा सुपुर्दगी किंवा प्रदान हप्त्याहप्त्यांनी करण्याबाबत अथवा सुपुर्दगी किंवा प्रदान किंवा दोन्ही पुढे ढकलण्याबाबत उपबंध करता येईल.

(२) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या अधीनतेने, विक्रयाची संविदा लेखी किंवा तोंडी किंवा अंशतः लेखी व अंशतः तोंडी करता येईल अथवा त्यातील पक्षांच्या वर्तनाद्वारे उपलक्षित होऊ शकेल.

### संविदेची विषयवस्तू

विद्यमान किंवा भावी माल. ६. (१) जो माल संविदेचा विषय असेल तो एकतर विक्रेत्याच्या मालकीचा किंवा मालकी कब्जातील विद्यमान माल, अथवा भावी माल असू शकेल.

(२) एखादा माल विक्रेत्याला प्राप्त होणे हे, जी घटना घडेल वा घडणार नाही अशा एखाद्या संभावी घटनेवर अवलंबून असेल त्या बाबतीत, त्या मालाच्या विक्रयाची संविदा होऊ शकेल.

(३) भावी मालाचा सांप्रत विक्रय करण्यासाठी म्हणून विक्रेता विक्रयाची संविदा करतो त्या बाबतीत, ती संविदा त्या मालाच्या विक्रयाचा करार म्हणून प्रवर्तित होते.

७. एखादी संविदा विनिर्दिष्ट मालाच्या विक्रयासाठी झालेली असते त्या बाबतीत जर संविदा करण्यात आली त्यावेळी विक्रेत्याच्या नकळत तो माल नष्ट झाला असेल अथवा त्याचे इतके नुकसान झाले असेल की तो इतःपर संविदेतील त्याच्या वर्णनाशी जुळता राहिलेला नसेल तर, ती संविदा शून्य असते. संविदा करण्यापूर्वी माल नष्ट होणे.

८. जेव्हा एखादा करार विनिर्दिष्ट मालाच्या विक्रयासाठी झालेला असतो, आणि विक्रेत्याचा किंवा क्रेत्याचा काहीही दोष नसताना मागाहून, क्रेत्यावर जोखीम पडण्यापूर्वी तो माल नष्ट होतो अथवा त्याचे इतके नुकसान होते की तो इतःपर करारातील त्याच्या वर्णनाशी जुळता राहत नाही तेव्हा, तो करार त्यामुळे शून्य होतो. विक्रयापूर्वी पण विक्रयाच्या करारानंतर माल नष्ट होणे.

### किंमत

९. (१) विक्रयाच्या संविदेमध्ये किंमत त्या संविदेद्वारे ठरवता येईल किंवा तीद्वारे संमत झालेल्या पद्धतीने ठरवण्याचे मागे ठेवता येईल किंवा पक्षांमधील व्यवहारक्रमाद्वारे निर्धारित करता येईल. किंमतीची विनिश्चिती.

(२) जेव्हा किंमत पूर्वगामी उपबंधांनुसार निर्धारित करण्यात आली नसेल तेव्हा, क्रेता विक्रेत्यास वाजवी किंमत देईल. वाजवी किंमत म्हणजे काय हा प्रत्येक विशिष्ट प्रकरणातील परिस्थितीवर अवलंबून असणारा वस्तुस्थितिविषयक प्रश्न आहे.

१०. (१) त्रयस्थ पक्षाने केलेल्या मूल्यनाने किंमत ठरवायची या अटीवर जेव्हा मालाचा विक्रय करण्याचा करार झालेला असतो आणि असा त्रयस्थ पक्ष असे मूल्यन करू शकत नाही किंवा करत नाही तेव्हा, तो करार त्यामुळे शून्य होतो : अनुमूल्यन विक्रय करार.

परंतु, जर तो माल किंवा त्याचा कोणताही भाग क्रेत्याकडे सुपूर्द करण्यात आला असेल आणि त्याने विनियोजित केला असेल तर, तो त्याबद्दल वाजवी किंमत देईल.

(२) जेव्हा अशा त्रयस्थ पक्षास विक्रेत्याचा किंवा क्रेत्याचा दोष असल्यामुळे मूल्यन करण्यास प्रतिबंध होतो तेव्हा, दोषी नसलेल्या पक्षास दोषी पक्षाविरुद्ध नुकसानीसाठी दावा चालवता येईल.

### शर्ती व प्राश्वासने

११. संविदेच्या शब्दांवरून भिन्न उद्देश दिसून येत नसेल तर, किंमत देण्याच्या वेळेबाबतचे विबंध या विक्रयाच्या संविदेस सारभूत असल्याचे मानले जात नाही. वेळेबाबतचा अन्य कोणताही विबंध संविदेस सारभूत आहे किंवा नाही हे संविदेच्या शब्दांवर अवलंबून असते. वेळेबाबतचे विबंध.

१२. (१) विक्रय-संविदेचा जो विषय असेल त्या मालाच्या संदर्भात तिच्यात असलेला विबंध हा शर्त किंवा प्राश्वासन या स्वरूपाचा असू शकेल. शर्त व प्राश्वासन.

(२) शर्त म्हणजे संविदेच्या मुख्य प्रयोजनाला सारभूत असा विबंध असून त्याचा भंग झाल्यामुळे ती संविदा प्रत्यादिष्ट समजण्याचा अधिकार उद्भवतो.

(३) प्राश्वासन म्हणजे संविदेच्या मुख्य प्रयोजनाला सांपार्श्विक असा विबंध असून त्याचा भंग झाल्यामुळे नुकसानी मागण्याचा अधिकार उद्भवतो, पण माल नाकारण्याचा आणि संविदा प्रत्यादिष्ट समजण्याचा अधिकार उद्भवत नाही.

(४) विक्रय-संविदेतील विबंध हा शर्त आहे की प्राश्वासन आहे हे प्रत्येक बाबतीत संविदेचा अर्थ लावण्यावर अवलंबून असते. एखाद्या विबंधास संविदेमध्ये प्राश्वासन म्हटले असले तरीही ती शर्त असू शकेल.

१३. (१) जेव्हा विक्रय-संविदा विक्रेत्याने पूर्ण करावयाच्या कोणत्याही शर्तीच्या अधीन असेल तेव्हा, क्रेत्यास त्या शर्तीबाबत हक्कवर्जन करता येईल अथवा त्या शर्तीचा भंग हा प्राश्वासनाचा भंग आहे आणि ते संविदा प्रत्यादिष्ट समजून चालण्यास योग्य कारण नव्हे असे समजण्याचा पर्याय स्वीकारता येईल. शर्त केव्हा प्राश्वासन म्हणून समजावयाची.

(२) जेव्हा विक्रय-संविदा विभागणीयोग्य नसेल आणि क्रेत्याने माल किंवा त्याचा काही भाग स्वीकारला असेल, [1]* * * तेव्हा विक्रेत्याने पूर्ण करावयाच्या कोणत्याही शर्तीचा भंग हा, संविदेमध्ये तशा आशयाची व्यक्त किंवा उपलक्षित अट नसेल तर, प्राश्वासनाचा भंग आहे, माल नाकारण्यास आणि संविदा प्रत्यादिष्ट समजून चालण्यास योग्य कारण नव्हे असेच समजता येईल.

(३) जी शर्त किंवा जे प्राश्वासन पूर्ण करणे अशक्य असल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे त्याची पूर्तता करण्याबाबत कायद्याने माफी दिली आहे अशा कोणत्याही शर्तीच्या किंवा प्राश्वासनाच्या बाबतीत या कलमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

---

१. १९६३ चा अधिनियम ३३, कलम ३ द्वारे "किंवा जेव्हा संविदा ही, ज्यातील मालकीहक्क क्रेत्याकडे गेलेला आहे अशा विशिष्ट मालाकरिता असेल" हे शब्द गाळले.

**हक्क, इत्यादीबाबतचे उपलक्षित अभिवचन.** १४. विक्रयाच्या संविदेत, संविदेच्या परिस्थितीवरून भिन्न उद्देश दिसून येत नसेल तर,—

(क) विक्रेत्याच्या पक्षी, विक्रयाच्या बाबतीत, मालाचा विक्रय करण्याचा त्याला अधिकार आहे आणि विक्रय-कराराच्या बाबतीत, मालकीहक्क जेव्हा संक्रामित व्हावयाचा त्यावेळी त्या मालाचा विक्रय करण्याचा त्याला अधिकार असेल अशी उपलक्षित शर्त असते;

(ख) क्रेत्याकडे त्या मालाचा निर्वेध कब्जा राहील व तो त्याला उपभोगता येईल असे उपलक्षित प्राश्वासन असते;

(ग) जेव्हा संविदा करण्यात आली त्यापूर्वी किंवा त्यावेळी जाहीर न केलेल्या किंवा क्रेत्यास ज्ञात नसलेल्या अशा, कोणत्याही त्रयस्थ पक्षाच्या प्रीत्यर्थ असलेल्या कोणत्याही प्रभारापासून किंवा बोजापासून माल मुक्त असेल असे उपलक्षित प्राश्वासन असते.

**वर्णनानुसारी विक्रय.** १५. जेव्हा वर्णनानुसारी माल-विक्रयाची संविदा असते तेव्हा, माल वर्णनाशी जुळता असेल अशी उपलक्षित शर्त असते; आणि जर विक्रय नमुनानुसारी व तसेच वर्णनानुसारी असेल तर, अधिकांश माल नमुन्याशी जुळता असला तरी वर्णनाशीही जुळता नसेल तर तेवढे पुरेसे होणार नाही.

**प्रत किंवा योग्यता याबाबत उपलक्षित शर्ती.** १६. या अधिनियमाचे आणि त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याचे उपबंध यांच्या अधीनतेने, विक्रय-संविदेखाली पुरवलेल्या मालाची प्रत किंवा कोणत्याही विशिष्ट प्रयोजनार्थ योग्यता याबाबत, पुढील बाबी खेरीजकरून, कोणतेही उपलक्षित प्राश्वासन किंवा शर्त नसते,—

(१) जेव्हा माल कशासाठी आवश्यक आहे ते विशिष्ट प्रयोजन क्रेता व्यक्तपणे किंवा उपलक्षणेने विक्रेत्यास ज्ञात करून देतो व त्यामुळे क्रेता विक्रेत्याच्या कौशल्यावर किंवा निर्णय-शक्तीवर विसंबून आहे असे दिसते आणि माल अशा वर्णनाचा असतो की, जो पुरवणे हा विक्रेत्याच्या, (मग तो निर्माता वा उत्पादक असो वा नसो) धंद्याचाच एक भाग असतो तेव्हा, माल अशा प्रयोजनाच्या दृष्टीने वाजवीपणे योग्य असेल अशी उपलक्षित शर्त असते :

परंतु, एखाद्या विनिर्दिष्ट वस्तुचा तिच्या पेटंट किंवा अन्य व्यापारी नावाखाली विक्रय करण्याच्या संविदेच्या बाबतीत, तिची कोणत्याही विशिष्ट प्रयोजनार्थ योग्यता याबाबत कोणतीही उपलक्षित शर्त नसते.

(२) जेव्हा मालाचा वर्णनानुसारी क्रय केलेला असून, जो त्या वर्णनाच्या मालाचा व्यापार करतो (मग तो निर्माता वा उत्पादक असो वा नसो) अशा विक्रेत्याकडून तो खरेदी केलेला असेल तेव्हा, माल विक्रेय प्रतीचा असेल अशी उपलक्षित शर्त असते :

परंतु, जर क्रेत्याने माल तपासला असेल तर अशा तपासणीत जी वैगुण्ये उघड होणे साहजिक होते त्यांच्याविषयी कोणतीही उपलक्षित शर्त नसते.

(३) प्रत किंवा विशिष्ट प्रयोजनार्थ योग्यता याबाबतचे उपलक्षित प्राश्वासन किंवा शर्त व्यापारी परिपाठानुसार जोडता येईल.

(४) या अधिनियमाद्वारे उपलक्षित असे कोणतेही प्राश्वासन किंवा शर्त व्यक्त प्राश्वासना-मुळे किंवा शर्तीमुळे निष्परिणामक होत नाही मात्र उपलक्षित प्राश्वासन किंवा शर्त त्याच्याशी विसंगत असता कामा नये.

**नमुनानुसारी विक्रय.** १७. (१) विक्रय-संविदा ही, जेव्हा त्या संविदेत अशा आशयाची व्यक्त किंवा उपलक्षित अट असते तेव्हा नमुनानुसारी विक्रयाची संविदा असते.

(२) नमुनानुसारी विक्रयाच्या संविदेच्या बाबतीत,—

(क) अधिकांश माल प्रतीच्या दृष्टीने नमुन्याशी जुळता असेल;

(ख) क्रेत्याला अधिकांश माल नमुन्याशी ताडून पाहण्याची वाजवी संधी मिळेल;

(ग) माल, त्यास अविक्रेय बनवणारे जे वैगुण्य, नमुन्याची वाजवी तपासणी केली असता उघड होणार नाही अशा कोणत्याही वैगुण्यापासून मुक्त असेल,

अशी उपलक्षित शर्त असते.

## प्रकरण ३ रे

## संविदेचे परिणाम

### विक्रेता व क्रेता यांच्यामध्ये मालकी हक्काचे हस्तांतरण

**माल विनिश्चित असला पाहिजे.** १८. जेव्हा अविनिश्चित मालाच्या विक्रयाची संविदा असेल तेव्हा, माल विनिश्चित केला गेल्या-खेरीज व जाईतोपर्यंत मालामधील कोणताही मालकीहक्क क्रेत्याकडे हस्तांतरित होत नाही.

**मालकीहक्क जेव्हा संक्रामित व्हावा असा उद्देश असेल तेव्हा तो संक्रामित होतो.**

१९. (१) जेव्हा विनिश्चित किंवा विनिर्दिष्ट मालाच्या विक्रयाची संविदा असेल तेव्हा, त्यामधील मालकीहक्क ज्यावेळी हस्तांतरित व्हावा असा त्या संविदेमधील पक्षांचा उद्देश असेल त्यावेळी तो क्रेत्याकडे हस्तांतरित होतो.

(२) पक्षांच्या उद्देशाबाबत खातरजमा करण्याच्या प्रयोजनार्थ, संविदेतील शब्द, पक्षांचे वर्तन आणि त्या प्रकरणाची परिस्थिती ही लक्षात घेतली जातील.

(३) भिन्न उद्देश दिसून आला नाही तर, कलमे २० ते २४ यांमध्ये अंतर्भूत असलेले नियम म्हणजे त्या मालामधील मालकीहक्क क्रेत्याकडे ज्यावेळी संक्रमित व्हावयाचा असेल त्या वेळेबाबत पक्षांचा उद्देश काय होता त्याची खातरजमा करण्यासाठी असलेले नियम होत.

**सुपूर्दगीयोग्य स्थितीतील विनिर्दिष्ट माल.**

२०. जेव्हा सुपूर्दगीयोग्य स्थितीतील विनिर्दिष्ट मालाच्या विक्रयाची बिनशर्त संविदा केलेली असेल तेव्हा, त्या मालामधील मालकीहक्क, ज्यावेळी संविदा करण्यात येते त्यावेळी क्रेत्याकडे संक्रामित होतो, आणि किंमत देण्याची वेळ अथवा मालाच्या सुपूर्दगीची वेळ अथवा दोन्ही पुढे ढकलण्यात आली आहेत किंवा काय हे गौण असते.

**विनिर्दिष्ट माल सुपूर्दगीयोग्य स्थितीत आणणे.**

२१. जेव्हा विनिर्दिष्ट मालाच्या विक्रयाची संविदा केलेली असेल आणि माल सुपूर्दगीयोग्य स्थितीत आणण्याच्या प्रयोजनासाठी विक्रेता त्याच्या बाबतीत एखादी गोष्ट करण्यास बांधलेला असेल तेव्हा, अशी गोष्ट करण्यात येऊन क्रेत्यास त्याची दखल मिळेतोपर्यंत मालकीहक्क संक्रमित होत नाही.

**सुपूर्दगीयोग्य स्थितीतील विनिर्दिष्ट माल-किंमत विनिश्चित करण्यासाठी विक्रेत्याने त्याच्या बाबतीत एखादी गोष्ट करावयाची असेल तेव्हा.**

२२. जेव्हा सुपूर्दगीयोग्य स्थितीतील विनिर्दिष्ट मालाच्या विक्रयाची संविदा केलेली असेल, पण विक्रेता किंमत विनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी त्या मालाचे वजन करण्यास, त्याचे मोजमाप करण्यास, त्यांची कसोटी लावून पाहण्यास अथवा त्याबाबत अन्य एखादी कृती किंवा गोष्ट करण्यास बांधलेला असेल तेव्हा, अशी कृती किंवा गोष्ट करण्यात येऊन क्रेत्यास त्याची दखल मिळेतोपर्यंत मालकीहक्क संक्रामित होत नाही.

**अविनिश्चित मालाचा विक्रय आणि विनियोजन.**

२३. (१) जेव्हा अविनिश्चित अथवा भावी मालाच्या वर्णनानुसारी विक्रयाची संविदा केलेली असेल आणि त्या वर्णनाचा व सुपूर्दगीयोग्य स्थितीतील माल क्रेत्याच्या अनुमतीने विक्रेत्याने किंवा विक्रेत्याच्या अनुमतीने क्रेत्याने त्या संविदेप्रीत्यर्थ बिनशर्त विनियोजित केला असेल तेव्हा, त्या मालामधील मालकीहक्क तदनंतर क्रेत्याकडे संक्रमित होतो. अशी अनुमती व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल, आणि विनियोजन केले जाण्यापूर्वी किंवा त्यानंतर ती देता येईल.

**परिवाहकास सुपूर्दगी.**

(२) जेव्हा संविदेस अनुसरून विक्रेता, क्रेत्यास, अथवा क्रेत्याकडे रवाना करण्यासाठी परिवाहकास किंवा अन्य उपनिहितीस (—मग तो क्रेत्याने नामनिर्दिष्ट केलेला असो वा नसो—) माल सुपूर्द करतो आणि विल्हेवाट करण्याचा अधिकार राखून ठेवत नाही तेव्हा, त्याने तो माल संविदेप्रीत्यर्थ विनियोजित केला असल्याचे मानले जाते.

**जांगडबोलीवर किंवा 'विक्रय वा परतीच्या बोलीवर' पाठवलेला माल.**

२४. जेव्हा माल जांगडबोलीवर किंवा 'विक्रय वा परतीच्या बोलीवर' किंवा इतर तत्सम अटींवर क्रेत्याकडे सुपूर्द करण्यात येतो तेव्हा, त्यातील मालकीहक्क क्रेत्याकडे—

(क) तो आपली पसंती किंवा स्वीकृती विक्रेत्यास दर्शवतो अथवा तो संव्यवहार अंगीकृत करणारी अन्य कोणतीही कृती करतो तेव्हा;

(ख) जर त्याने आपली पसंती किंवा स्वीकृती विक्रेत्यास दर्शविली नाही, पण माल नाकारल्याची नोटीस न देता त्याने तो ठेवून घेतला तर, माल परत करण्यासाठी अवधी ठरवलेला असल्यास, असा अवधी संपताच आणि कोणताही अवधी ठरवलेला नसल्यास, वाजवी अवधी संपताच संक्रामित होतो.

**विल्हेवाटीचा अधिकार राखून ठेवणे.**

२५. (१) जेव्हा विनिर्दिष्ट मालाच्या विक्रयाची संविदा असेल किंवा माल मागाहून संविदेप्रीत्यर्थ विनियोजित करण्यात आला असेल तेव्हा, संविदेच्या किंवा विनियोजनाच्याद्वारे, विक्रेत्यास विवक्षित शर्ती पूर्ण करण्यात येईतोपर्यंत मालाच्या विल्हेवाटीचा अधिकार राखून ठेवता येईल. अशा बाबतीत, क्रेत्यास अथवा क्रेत्याकडे रवाना करण्यासाठी परिवाहकास किंवा अन्य उपनिहितीस मालाची सुपूर्दगी करण्यात आलेली असली तरीही, विक्रेत्याने लादलेल्या शर्ती पूर्ण करण्यात येईपर्यंत, मालामधील मालकीहक्क क्रेत्याकडे संक्रामित होणार नाही.

[1][(२) माल जहाजाने पाठवण्यास आला असेल किंवा रेल्वेने वाहून नेण्यासाठी रेल्वे-प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आला असेल आणि, प्रकरणपरत्वे, भरणपत्राद्वारे किंवा रेल्वे-पावतीद्वारे माल-विक्रेत्याच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या आदेशानुसार सुपूर्द करावयाचा असेल तेव्हा, विक्रेत्याने मालाच्या विल्हेवाटीचा अधिकार राखून ठेवला असल्याचे सकृत्दर्शनी मानले जाईल.

---

१. १९६३ चा अधिनियम ३३, कलम ४ द्वारे मूळ पोटकलम (२) आणि (३) ऐवजी घातले.

(३) जेव्हा माल-विक्रेता किमतीसाठी विक्रेत्यावर विनिमयपत्र काढतो आणि त्याचा स्वीकार किंवा भरणा होण्याची खात्रीलायक तजवीज करण्यासाठी ते भरणापत्राच्या किंवा प्रकरणपरत्वे रेल्वे-पावतीच्या सोबत क्रेत्याकडे रवाना करतो तेव्हा क्रेता, त्याने तो विनिमयपत्र संमानले नाही तर, भरणपत्र किंवा रेल्वे-पावती परत करण्यास बांधलेला असतो आणि त्याने ते भरणपत्र किंवा रेल्वे-पावती गैरपणे ठेऊन घेतली तर मालामधील मालकीहक्क त्याच्याकडे संक्रामित होत नाही.

स्पष्टीकरण.—या कलमात "रेल्वे" आणि "रेल्वे प्रशासन" या शब्दप्रयोगांना, 'भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०' (१८९० चा ९) याखाली त्यांना ठरवून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.]

जोखीम सकृतदर्शनी मालकीहक्काबरोबर संक्रामित होते.

२६. अन्यथा करार झालेला नसल्यास, मालामधील मालकीहक्क क्रेत्याकडे हस्तांतरित होईतोपर्यंत तो विक्रेत्याच्या जोखमीवर असतो, पण त्यामधील मालकीहक्क क्रेत्याकडे हस्तांतरित होतो तेव्हा, तो माल क्रेत्याच्या जोखमीवर असतो—मग त्याची सुपूर्दगी झालेली असो वा नसो :

परंतु, क्रेत्याचा किंवा विक्रेत्याचा दोष असल्यामुळे सुपूर्दगीला विलंब झालेला असेल तेव्हा असा दोष नसता तर, जी हानी घडून आली नसती, अशा कोणत्याही हानीपुरती त्या मालाची जोखीम दोषी व्यक्तीवर असते :

परंतु, आणखी असे की, विक्रेता किंवा क्रेता यांची, परस्परांच्या संबंधात मालाचा उपनिहिती म्हणून जी कर्तव्ये किंवा दायित्वे असतील त्यांवर या कलमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

### हक्काचे हस्तांतर

मालक नसलेल्या व्यक्तीकडून विक्रय.

२७. या अधिनियमाच्या आणि त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या अधीनतेने, जेव्हा एखादी व्यक्ती ज्या मालाची ती मालक नाही तो माल विकते आणि ती त्याचा विक्रय मालकाच्या प्राधिकारान्वये किंवा त्याच्या संमतीने करत नाही तेव्हा, विक्रय करण्याचा विक्रेत्याचा प्राधिकार नाकबूल करण्यास मालाच्या मालकास आपल्या वर्तनामुळे प्रतिबंध झाला नसल्यास विक्रेत्याला मालावर जेवढा हक्क होता त्याहून अधिक सबळ हक्क क्रेत्याला मिळत नाही :

परंतु, जेव्हा माल किंवा मालाचा एखादा हक्कलेख मालकाच्या संमतीने व्यापारी अभिकर्त्याच्या कब्जात असेल तेव्हा, व्यापारी अभिकर्ता म्हणून आपल्या कामाच्या सामान्य क्रमानुसार कार्य करत असताना त्याने केलेला कोणताही विक्रय जणू काही त्या मालाच्या मालकाने विक्रय करण्यास त्याला व्यक्तपणे प्राधिकृत केलेले असावे त्याप्रमाणे विधिग्राह्य असेल, परंतु क्रेता सद्भावपूर्वक वागला असला पाहिजे आणि विक्रयसंविदेच्या वेळी त्याला विक्रेत्यास विक्रयाचा प्राधिकार नाही याचा दखल असता कामा नये.

संयुक्त मालकांपैकी एकाकडून विक्रय.

२८. जर मालाच्या अनेक संयुक्त मालकांपैकी एकट्याचाच त्यावर सहमालकांच्या परवानगीने कब्जा असेल तर, जी व्यक्ती तो माल अशा संयुक्त मालकाकडून सद्भावपूर्वक विकत घेते आणि विक्रेत्यास विक्रयाचा प्राधिकार नाही याची विक्रय-संविदेच्या वेळी तिला दखल नसते अशा कोणत्याही व्यक्तीकडे मालामधील मालकीहक्क हस्तांतरित होतो.

शून्यकरणीय संविदेखाली कब्जा असलेल्या व्यक्तीकडून विक्रय.

२९. मालाच्या विक्रेत्याने त्याचा कब्जा 'भारतीय संविदा अधिनियम, १८७२' (१८७२ चा ९) याचे कलम १९ किंवा कलम १९-क याखाली शून्यकरणीय असलेल्या संविदेखाली मिळवला असेल, पण विक्रयाच्या वेळी ती संविदा विखंडित करण्यात आलेली नसेल, त्याबाबतीत तो माल सद्भावपूर्वक आणि विक्रेत्याच्या हक्कामधील वैगुण्याची दखल नसताना क्रेत्याने विकत घेतलेला असेल तर, त्याला त्या मालावर सबळ हक्क मिळतो

विक्रयानंतर विक्रेता किंवा क्रेता यांच्याकडे कब्जा राहणे.

३०. (१) जेव्हा एखाद्या व्यक्तीने माल विकल्यावर, त्या मालाच्या किंवा त्या मालाच्या हक्कलेखांचा कब्जा तिच्याकडे राहील किंवा तिला मिळेल तेव्हा, त्या व्यक्तीने किंवा तिच्याकरिता कार्य करणाऱ्या व्यापारी अभिकर्त्याने त्या मालाचा कोणताही विक्रय, तारण किंवा अन्य व्यवस्था याअन्वये कोणत्याही व्यक्तीस तो माल किंवा ते हक्कलेख सुपूर्द किंवा हस्तांतरित केले आणि त्या व्यक्तीने सद्भावपूर्वक व आधीच्या विक्रयाची दखल नसताना त्यांचा स्वीकार केला तर, सुपूर्दगी किंवा हस्तांतरण करणारी व्यक्ती जणू काही ते करण्यास मालाच्या मालकाकडून व्यक्तपणे प्राधिकृत झालेली असावी त्याप्रमाणेच ते परिणामक होईल.

(२) जेव्हा एखादी व्यक्ती, तिने माल विकत घेतल्यावर किंवा विकत घेण्याचा करार केल्यावर, विक्रेत्याच्या संमतीने त्या मालाचा किंवा त्या मालाच्या हक्कलेखांचा कब्जा मिळवील तेव्हा, त्या व्यक्तीने किंवा तिच्याकरिता कार्य करणाऱ्या व्यापारी अभिकर्त्याने त्याचा कोणताही विक्रय, तारण किंवा अन्य व्यवस्था याअन्वये कोणत्याही व्यक्तीस तो माल किंवा ते हक्कलेख सुपूर्द किंवा हस्तांतरित केले आणि त्या व्यक्तीने त्या मालाबाबत मूळ विक्रेत्यास असलेल्या कोणत्याही धारणाधिकाराची किंवा अन्य कोणत्याही अधिकाराची दखल नसताना तो माल किंवा ते हक्कलेख सद्भावपूर्वक स्वीकारले तर, जणू काही असा धारणाधिकार किंवा अधिकार अस्तित्वात नसावा त्याप्रमाणे सुपूर्दगी किंवा हस्तांतरण परिणामक होईल.

## प्रकरण ४ थे

### संविदेचे पालन

*विक्रेता आणि क्रेता यांची कर्तव्ये.*

३१. विक्रय-संविदेच्या अटींनुसार, माल सुपूर्द करणे हे विक्रेत्याचे आणि त्याचा स्वीकार करणे व किंमत देणे हे क्रेत्याचे कर्तव्य आहे.

*किंमत देणे आणि सुपूर्दगी करणे या समवर्ती शर्ती आहेत.*

३२. अन्यथा करार झालेला नसल्यास, मालाची सुपूर्दगी करणे आणि किंमत देणे या समवर्ती शर्ती आहेत, म्हणजेच, विक्रेता किंमतीच्या बदल्यात मालाचा कब्जा क्रेत्याला देण्यास तयार व राजी असेल आणि क्रेता मालाच्या कब्जाच्या बदल्यात मालाची किंमत देण्यास तयार व राजी असेल.

*सुपूर्दगी.*

३३. विकलेल्या मालाची सुपूर्दगी करावयाची झाल्यास जी गोष्ट सुपूर्दगी म्हणून समजली पाहिजे असा पक्षांमध्ये करार होतो अथवा ज्याच्या परिणामी माल क्रेत्याच्या कब्जात किंवा त्याच्या वतीने तो धारण करण्यास प्राधिकृत झालेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात जाईल अशी कोणतीही गोष्ट करून ती सुपूर्दगी करता येईल.

*अंशतः सुपूर्दगीचा परिणाम.*

३४. संपूर्ण मालाच्या सुपूर्दगीच्या ओघात झालेली अंशतः मालाची सुपूर्दगी ही अशा मालातील मालकीहक्क संक्रमित होण्याच्या प्रयोजनार्थ सर्व मालाच्या सुपूर्दगी प्रमाणेच परिणामक असते; पण अंशतः माल संपूर्ण मालातून अलग करण्याच्या उद्देश्याने करण्यात आलेली त्याची सुपूर्दगी ही उर्वरित मालाची सुपूर्दगी म्हणून प्रवर्तित होत नाही.

*क्रेत्याने सुपूर्दगीकरता आवेदन करणे.*

३५. कोणतीही व्यक्त संविदा सोडल्यास, क्रेता सुपूर्दगीकरता आवेदन करीपर्यंत मालाचा विक्रेता त्याची सुपूर्दगी करण्यास बांधलेला नसतो.

*सुपूर्दगीबाबत नियम.*

३६. (१) क्रेत्याने माल कब्जात घ्यावयाचा की विक्रेत्याने तो क्रेत्यास पाठवावयाचा हा प्रत्येक प्रकरणी पक्षांमधील व्यक्त किंवा उपलक्षित संविदेवर अवलंबून असणारा प्रश्न आहे. अशी कोणतीही संविदा सोडल्यास, विकलेला माल विक्रयाच्या वेळी तो ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी सुपूर्द करावयाचा असतो आणि विक्रयाचा करार करण्यात आलेला माल, विक्रय-कराराच्या वेळी तो ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी, किंवा त्यावेळी तो अस्तित्वात नसल्यास तो ज्या ठिकाणी निर्माण केला किंवा उत्पादित केला जाईल त्या ठिकाणी सुपूर्द करावयाचा असतो.

(२) विक्रयाच्या संविदेअन्वये विक्रेता क्रेत्याला माल पाठवण्यास बांधलेला असेल, पण तो पाठवण्यासाठी कोणतीही वेळ निश्चित केलेली नसेल त्या बाबतीत, विक्रेता तो माल वाजवी अवधीत पाठवण्यास बांधलेला असतो.

(३) विक्रयाच्या वेळी माल त्रयस्थ व्यक्तीच्या कब्जात असेल त्या बाबतीत, अशा त्रयस्थ व्यक्तीकडून क्रेत्याला आपण त्याच्या वतीने माल धारण करत आहोत अशी अभिस्वीकृती दिली गेल्याशिवाय व दिली जाईपर्यंत क्रेत्याकडून विक्रेत्याकडे सुपूर्दगी होत नाही:

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे मालाचा कोणताही हक्कलेख पुर:सृत किंवा हस्तांतरित करणे यांच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.

(४) सुपूर्दगीची मागणी किंवा निविदान, ते योग्य वेळी करण्यात आले नाही तर, निष्परिणामक झाल्याचे समजता येईल. योग्य वेळ कोणती हा वस्तुस्थितिविषयक प्रश्न आहे.

(५) अन्यथा करार झाला नसल्यास, माल सुपूर्दगीयोग्य स्थितीत आणण्याचा व त्यास आनुषंगिक असलेला खर्च विक्रेत्याला सोसावा लागेल.

*चुकीच्या परिमाणात सुपूर्दगी.*

३७. (१) जेव्हा विक्रेता त्याने जेवढ्या मालाचा विक्रय करण्याची संविदा केली असेल त्यापेक्षा कमी परिमाणात माल क्रेत्याकडे सुपूर्द करील तेव्हा, तो क्रेत्यास नाकारता येईल, पण याप्रमाणे सुपूर्द केलेला माल क्रेत्याने स्वीकारला तर तो संविदा-दराने त्याची किंमत देईल.

(२) जेव्हा विक्रेता, त्याने जेवढ्या मालाचा विक्रय करण्याची संविदा केली असेल त्यापेक्षा अधिक परिमाणात माल क्रेत्याकडे सुपूर्द करील तेव्हा, क्रेत्यास संविदानिविष्ट असलेला माल स्वीकारता येईल व बाकीचा नाकारता येईल किंवा त्यास तो सर्वच्या सर्व नाकारता येईल. जर क्रेत्याने याप्रमाणे सुपूर्द करण्यात आलेला सर्वच्या सर्व माल स्वीकारला तर तो संविदा-दराने त्याची किंमत देईल.

(३) जेव्हा विक्रेता, त्याने ज्या मालाचा विक्रय करण्याची संविदा केली असेल त्यात, संविदा निविष्ट नसलेला असा भिन्न वर्णनाचा माल मिसळून क्रेत्याकडे सुपूर्द करील तेव्हा, क्रेत्यास संविदेनुसार असेल तो माल स्वीकारता येईल व बाकीचा नाकारता येईल किंवा तो सर्वच्या सर्व नाकारता येईल.

(४) या कलमाचे उपबंध हे कोणताही व्यापारी परिपाठ, पक्षांमधील विशेष करार किंवा त्यांच्यामधील व्यवहारक्रम यांस अधीन आहेत.

*हप्त्याहप्त्याने सुपूर्दगी.*

३८. (१) अन्यथा करार झालेला नसल्यास, मालाचा क्रेता त्याची सुपूर्दगी हप्त्याहप्त्याने स्वीकारण्यास बांधलेला नसतो.

(२) जेव्हा मालाच्या विक्रयाची संविदा झालेली असून तो ठरलेल्या हप्त्यांनी सुपूर्द करावयाचा असेल व त्यांच्या किंमती वेगवेगळ्या द्यावयाच्या असतील आणि विक्रेत्याने एका किंवा अधिक हप्त्यांबाबत सुपूर्दगी केलीच नाही किंवा सदोष सुपूर्दगी केली असेल, अथवा क्रेत्याने एका किंवा अधिक हप्त्यांची सुपूर्दगी घेण्याबाबत किंवा त्यांची किंमत देण्याबाबत उपेक्षा केली किंवा ते करण्यास नकार दिला तर संविदेचा भंग हा संपूर्ण संविदेचा प्रत्यादेश आहे की ज्यातून नुकसानभरपाईचा मागणीहक्क निष्पन्न होईल पण संपूर्ण संविदा प्रत्यादिष्ट समजून चालण्याचा अधिकार निष्पन्न होणार नाही असा तो संविदेपासून अलग करता येण्यासारखा भंग आहे हा प्रत्येक प्रकरणी संविदेच्या अटी आणि त्या प्रकरणातील परिस्थिती यांवर अवलंबून असणारा प्रश्न आहे.

**परिवाहकास किंवा मालधक्कावाल्यास सुपूर्दगी.** ३९. (१) जेव्हा विक्रयाच्या संविदेस अनुसरून, विक्रेत्याला क्रेत्याकडे माल पाठविण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल किंवा त्याच्याकडे तशी मागणी करण्यात आली असेल तेव्हा, क्रेत्याकडे माल पाठवण्याच्या प्रयोजनासाठी मालाची परिवाहकाकडे—मग क्रेत्याने तो नामनिर्दिष्ट केलेला असो वा नसो—केलेली सुपूर्दगी किंवा सुरक्षित ताब्यासाठी मालाची मालधक्कावाल्याकडे केलेली सुपूर्दगी म्हणजे मालाची क्रेत्याकडे केलेली सुपूर्दगी असल्याचे सकृतदर्शनी मानले जाईल.

(२) क्रेत्याने अन्यथा प्राधिकृत केले नसेल तर, विक्रेता क्रेत्याच्या वतीने परिवाहकाशी किंवा मालधक्कावाल्याशी मालाचे स्वरूप आणि त्या प्रकरणातील अन्य परिस्थिती लक्षात घेता वाजवी असेल अशी संविदा करील. जर विक्रेत्याने असे केले नाही आणि माल मार्गक्रमणाच्या ओघात असताना किंवा मालधक्कावाल्याच्या ताब्यात असताना गहाळ झाला किंवा त्यास नुकसान पोहोचले तर, परिवाहकाकडे किंवा मालधक्कावाल्याकडे केलेली सुपूर्दगी ही स्वतःकडे केलेली सुपूर्दगी समजण्यास क्रेता नकार देऊ शकेल किंवा विक्रेत्यास नुकसानी देण्यास जबाबदार धरू शकेल.

(३) अन्यथा करार झालेला नसल्यास, जेव्हा विमा उतरवण्याचा शिरस्ता असेल अशा परिस्थितीत, विक्रेत्याने समुद्रप्रवास अंतर्भूत असलेल्या मार्गाने क्रेत्याकडे माल पाठवला असेल त्या बाबतीत विक्रेता क्रेत्यास, माल समुद्रप्रवासात असताना त्याचा विमा उतरवणे जिच्यामुळे त्यास शक्य होईल अशी नोटीस देईल, आणि जर विक्रेता तसे करण्यास चुकला तर, असा समुद्रप्रवास चालू असताना मालाची जोखीम त्याच्यावर असल्याचे मानले जाईल.

**माल दूरच्या ठिकाणी सुपूर्द करण्यात येतो त्या बाबतीतील जोखीम.** ४०. मालाच्या विक्रेत्याने, माल जेव्हा विकण्यात आला तेव्हा तो ज्याठिकाणी असेल त्याहून अन्य ठिकाणी आपल्या जोखमीवर तो सुपूर्द करण्याचा करार केला तरीही त्या बाबतीत, अन्यथा करार झालेला नसल्यास, मार्गक्रमणाला अपरिहार्यपणे आनुषंगिक असलेली मालाच्या खराबीबाबतची कोणतीही जोखीम त्याला पत्करावी लागेल.

**मालाची तपासणी करण्याचा क्रेत्याचा अधिकार.** ४१. (१) जेव्हा क्रेत्यास, त्याने आधी ज्याची तपासणी केलेली नाही असा माल सुपूर्द करण्यात येतो तेव्हा तो संविदेनुरूप आहे याची खातरजमा करण्यासाठी, त्याची तपासणी करण्याची त्यास वाजवी संधी मिळाल्याशिवाय व मिळेतोपर्यंत त्याने त्याचा स्वीकार केला असल्याचे मानले जात नाही.

(२) अन्यथा करार झालेला नसल्यास, जेव्हा विक्रेता क्रेत्याकडे मालाच्या सुपूर्दगीचे निविदान करतो तेव्हा, माल संविदेनुरूप आहे याची खातरजमा करण्यासाठी, मालाची तपासणी करण्याची वाजवी संधी क्रेत्याला त्याच्या विनंतीवरून उपलब्ध करून देण्यास विक्रेता बांधलेला असतो.

**स्वीकार.** ४२. आपण माल स्वीकारला आहे असे जेव्हा क्रेता विक्रेत्यास कळवतो तेव्हा, किंवा त्याच्याकडे माल सुपूर्द करण्यात आला असताना तो त्याच्या संबंधात विक्रेत्याच्या मालकीशी विसंगत असेल अशी एखादी कृती करतो, किंवा वाजवी अवधी उलटून गेल्यानंतर क्रेता तो माल, आपण तो नाकारला आहे असे विक्रेत्यास न कळवता ठेवून घेतो तेव्हा, त्याने माल स्वीकारला असल्याचे मानले जाते.

**नाकारलेला माल परत करण्यास क्रेता बांधलेला नाही.** ४३. अन्यथा करार झालेला नसल्यास, जेव्हा माल क्रेत्याकडे सुपूर्द करण्यात येतो आणि त्याचा स्वीकार करण्यास तो नकार देतो व त्यास तसे करण्याचा अधिकार असतो तेव्हा, तो विक्रेत्याकडे माल परत पाठवण्यास बांधलेला नसतो, तर आपण तो स्वीकारण्यास नकार देत आहोत असे त्याने विक्रेत्यास कळवले तरी पुरेसे असते.

**मालाची सुपूर्दगी स्वीकारण्याबाबत उपेक्षा केल्याबद्दल किंवा त्यास नकार दिल्याबद्दल क्रेत्याचे दायित्व.** ४४. जेव्हा विक्रेता माल सुपूर्द करण्यास तयार व राजी असून क्रेत्याला सुपूर्दगी स्वीकारण्यास विनंती करतो आणि अशी विनंती करण्यात आल्यानंतर वाजवी अवधीत क्रेता मालाची सुपूर्दगी स्वीकारीत नाही तेव्हा, त्याने सुपूर्दगी स्वीकारण्याबाबत उपेक्षा केल्यामुळे किंवा त्यास नकार दिल्यामुळे झालेल्या कोणत्याही हानीबद्दल आणि मालाची देखभाल व ताबा यासाठी येणाऱ्या वाजवी खर्चाबद्दलही तो विक्रेत्यास दायी असतो:

परंतु, जेव्हा विक्रेत्याने मालाची सुपूर्दगी स्वीकारण्याबाबत उपेक्षा करणे किंवा त्यास नकार देणे हे संविदेचा प्रत्यादेश या सदरात मोडत असेल तेव्हा, या कलमातील कोणत्याही गोष्टीचा विक्रेत्याच्या अधिकारावर परिणाम होणार नाही.

## प्रकरण ५ वे

### अप्राप्तमूल्य विक्रेत्याचे मालाच्या बाबतीतील अधिकार

"अप्राप्तमूल्य विक्रेता" याची व्याख्या.

४५. (१) (क) जेव्हा मालाची संपूर्ण किंमत देण्यात आली नसेल किंवा तिचे निविदान करण्यात आले नसेल तेव्हा;

(ख) जेव्हा एखादे विनिमयपत्र किंवा अन्य परक्राम्य संलेख हा सशर्त मूल्यप्रदान म्हणून मिळाला असेल आणि ज्या शर्तीवर तो मिळाला ती शर्त संलेख अवमानला गेल्याकारणाने किंवा अन्यथा पूर्ण करण्यात आली नसेल तेव्हा;

मालाचा विक्रेता या अधिनियमाच्या अर्थानुसार "अप्राप्तमूल्य विक्रेता" असल्याचे मानले जाईल.

(२) या प्रकरणात, "विक्रेता" या संज्ञेत, जी विक्रेत्याच्या स्थानी आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे, जसे उदा. भरणपत्र ज्याच्या नावे पृष्ठांकित केलेले आहे असा विक्रेत्याचा अभिकर्ता, अथवा ज्याने स्वतः किंमत दिली आहे किंवा तिच्याकरता जो प्रत्यक्षपण जबाबदार आहे असा मालप्रेषक किंवा अभिकर्ता.

अप्राप्तमूल्य विक्रेत्याचे अधिकार.

४६. (१) या अधिनियमाच्या आणि त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या अधीनतेने, मालातील मालकीहक्क क्रेत्याकडे संक्रामित झालेला असला तरीही, अप्राप्तमूल्य मालविक्रेत्यास त्या नात्याने, कायद्याच्या उपलक्षणेने—

(क) माल त्याच्या कब्जात असताना त्यावर किंमतीपुरता धारणाधिकार असतो;

(ख) त्याने त्याचा कब्जा सोडल्यानंतर, क्रेता दिवाळखोर झाल्यास, मार्गक्रमणात असलेल्या मालास अटकाव करण्याचा अधिकार असतो;

(ग) या अधिनियमाद्वारे मर्यादित केल्याप्रमाणे फेरविक्रयाचा अधिकार असतो.

(२) मालातील मालकीहक्क क्रेत्याकडे संक्रामित झाला नसेल त्याबाबतीत, अप्राप्तमूल्य विक्रेत्याला, त्यास उपलब्ध असलेल्या अन्य उपायांव्यतिरिक्त आणखी सुपूर्दगी रोखून धरण्याचा अधिकार असतो आणि क्रेत्याकडे मालकीहक्क संक्रामित झाला असता त्याला मिळणाऱ्या धारणाधिकाराशी व मार्गक्रमणात अटकाव करण्याच्या अधिकाराशी पूर्वोक्त अधिकार सदृश व समव्यापी असतो.

### अप्राप्तमूल्य विक्रेत्याचा धारणाधिकार

विक्रेत्याचा धारणाधिकार.

४७. (१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, माल ज्याच्या कब्जात असेल असा त्याचा अप्राप्तमूल्य विक्रेता किंमत दिली जाईपर्यंत किंवा तिचे निविदान होईपर्यंत, पुढील बाबतीत, तो कब्जात ठेवून घेण्याला हक्कदार असतो, त्या अशा—

(क) उधारीबाबत कोणताही निबंध केल्याशिवाय माल विकण्यात आलेला आहे त्याबाबतीत;

(ख) माल उधारीवर विकण्यात आला आहे, पण उधारीची मुदत संपली आहे त्याबाबतीत;

(ग) क्रेता दिवाळखोर होतो त्याबाबतीत.

(२) विक्रेत्यास, क्रेत्याचा अभिकर्ता किंवा उपनिहिती म्हणून जरी माल त्याच्या कब्जात असला तरीही, धारणाधिकार वापरता येईल.

अंशतः सुपूर्दगी.

४८. अप्राप्तमूल्य विक्रेत्याने मालाची अंशतः सुपूर्दगी केली असेल त्याबाबतीत, धारणाधिकारासंबंधी हक्कवर्जन करण्याचा करार जिच्यावरून दिसून येईल अशा परिस्थितीमध्ये अशी अंशतः सुपूर्दगी केलेली नसेल तर, त्याला उर्वरित मालावर आपला धारणाधिकार वापरता येईल.

धारणाधिकाराचे समापन.

४९. (१) मालाचा अप्राप्तमूल्य विक्रेता त्यावरील आपला धारणाधिकार पुढीलप्रकारे गमावतो—

(क) जेव्हा तो मालाच्या विल्हेवाटीचा अधिकार राखून न ठेवता, परिवाहकाला किंवा अन्य उपनिहितीला तो माल क्रेत्याकडे पाठवण्यासाठी सुपूर्द करतो तेव्हा;

(ख) जेव्हा क्रेता किंवा त्याचा अभिकर्ता कायदेशीरपणे मालाचा कब्जा मिळवतो तेव्हा;

(ग) त्याबाबत हक्कवर्जन करतो तेव्हा.

(२) मालाचा जो विक्रेता अप्राप्तमूल्य असून त्याचा त्यावर धारणाधिकार आहे तो, केवळ त्याने मालाच्या किंमतीबद्दल हुकूमनामा मिळविला आहे एवढ्याच कारणाने आपला धारणाधिकार गमावत नाही.

### मार्गक्रमणात अटकाव

मार्गक्रमणात अटकाव करण्याचा अधिकार.

५०. या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, जेव्हा मालाचा क्रेता दिवाळखोर होतो तेव्हा, माल ज्याच्या कब्जातून गेला आहे त्या अप्राप्तमूल्य मालविक्रेत्यास, तो माल मार्गक्रमणात असताना त्यास अटकाव करण्याचा अधिकार आहे, म्हणजेच माल मार्गक्रमणाच्या ओघात असेतोपर्यंत त्याला त्याचा पुन्हा कब्जा घेता येईल, आणि किंमत दिली जाईपर्यंत किंवा तिचे निविदान होईपर्यंत तो ठेवून घेता येईल.

मार्गक्रमणाचा अवधी.

५१. (१) क्रेत्याकडे पाठवण्यासाठी माल जेव्हा परिवाहकाकडे किंवा अन्य उपनिहितीकडे सुपूर्द करण्यात येतो त्या वेळेपासून, क्रेता किंवा त्याचा त्यासंबंधातील अभिकर्ता अशा परिवाहकाकडून किंवा अन्य उपनिहितीकडून त्याची सुपूर्दगी स्वीकारीपर्यंत तो मार्गक्रमणाच्या ओघात असल्याचे मानण्यात येते.

(२) तो माल मुक्कामाला येण्यापूर्वी जर क्रेत्याने किंवा त्यासंबंधातील त्याच्या अभिकर्त्याने त्याची सुपूर्दगी मिळवली तर, मार्गक्रमण समाप्त होते.

(३) माल ठरलेल्या मुक्कामी आल्यानंतर, जर परिवाहकाने किंवा अन्य उपनिहितीने क्रेत्यास किंवा त्याच्या अभिकर्त्यास आपण त्याच्यावतीने माल धारण करीत आहोत अशी अभिस्वीकृती दिली आणि क्रेत्याचा किंवा त्याच्या अभिकर्त्याचा उपनिहिती म्हणून त्याचा कब्जा चालू ठेवला तर, मार्गक्रमण समाप्त होते आणि क्रेत्याने मालाचा पुढील मुक्काम निर्देशित केला असला तरीही ते गौण ठरते.

(४) जर क्रेत्याने माल नाकारला आणि परिवाहकाने किंवा अन्य उपनिहितीने त्याचा कब्जा चालू ठेवला तर, विक्रेत्याने जरी तो माल परत घेण्यास नकार दिला असला तरी, मार्गक्रमण समाप्त झाले असल्याचे मानण्यात येणार नाही.

(५) जेव्हा क्रेत्याने भाड्याने घेतलेल्या जहाजावर माल सुपूर्द करण्यात येतो तेव्हा, नौकाधिपतीने त्याचा कब्जा परिवाहक म्हणून की क्रेत्याचा अभिकर्ता म्हणून घेतला आहे हा त्या त्या विशिष्ट प्रकरणातील परिस्थितीवर अवलंबून असणारा प्रश्न आहे.

(६) जेव्हा परिवाहक किंवा अन्य उपनिहिती, क्रेत्याकडे किंवा त्यासंबंधातील त्याच्या अभिकर्त्याकडे माल सुपूर्द करण्यास गैरपणे नकार देतो तेव्हा, मार्गक्रमण समाप्त झाल्याचे मानण्यात येते.

(७) जेव्हा क्रेत्याकडे किंवा त्याबाबतीतील त्याच्या अभिकर्त्याकडे मालाची अंशत: सुपूर्दगी करण्यात आली असेल तेव्हा, संपूर्ण मालाचा कब्जा सोडून देण्याचा करार जिच्यावरून दिसून येईल अशा परिस्थितीत अशी अंशत: सुपूर्दगी करण्यात आली नसेल तर, उर्वरित मालास मार्गक्रमणात अटकाव करता येईल.

मार्गक्रमणात अटकाव कसा घडवून आणला जातो.

५२. (१) मालाचा प्रत्यक्षपणे कब्जा घेऊन, अथवा माल ज्याच्या कब्जात असेल अशा परिवाहकाला किंवा अन्य उपनिहितीला आपल्या मागणीहक्काची नोटीस देऊन अप्राप्तमूल्य विक्रेत्याला आपला मार्गक्रमणात अटकाव करण्याचा अधिकार बजावता येईल. माल प्रत्यक्षपणे जिच्या कब्जात असेल त्या व्यक्तीला किंवा तिच्या प्रकर्त्याला अशी नोटीस दिली जाऊ शकेल. दुसऱ्या बाबतीत, नोटीस परिणामकारी होण्यासाठी ती अशा वेळी व अशा परिस्थितीत द्यावी लागेल की, ज्यायोगे प्रकर्ता क्रेत्याकडे सुपूर्दगी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी वाजवी तत्परतेने आपल्या नोकराला किंवा अभिकर्त्याला ती वेळेवर कळवू शकेल.

(२) जेव्हा मार्गक्रमणात अटकाव करण्याची नोटीस क्रेत्याकडून माल कब्जात असलेल्या परिवाहकास किंवा अन्य उपनिहितीस देण्यात येईल तेव्हा तो, विक्रेत्याकडे किंवा विक्रेत्याच्या निदेशांनुसार माल प्रतिसुपूर्द करील. अशा प्रतिसुपूर्दगीचा खर्च विक्रेत्याला सोसावा लागेल.

## क्रेता आणि विक्रेता यांच्याकडून हस्तांतरण

क्रेत्याने केलेल्या पोटविक्रयाचा किंवा तारणाचा परिणाम.

५३. (१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, अप्राप्तमूल्य विक्रेत्याला असलेल्या धारणाधिकारावर किंवा मार्गक्रमणात अटकाव करण्याच्या अधिकारावर, क्रेत्याने मालाचा जो कोणताही विक्रय किंवा अन्य विल्हेवाट केलेली असेल त्याचा परिणाम होत नाही. मात्र विक्रेत्याने त्यास अनुमती दिलेली असेल तर गोष्ट अलाहिदा :

परंतु, जेव्हा मालाचा हक्कलेख कोणत्याही व्यक्तीस ती त्या मालाचा क्रेता किंवा मालक म्हणून देण्यात किंवा कायदेशीरपणे हस्तांतरित करण्यात आला असेल आणि त्या व्यक्तीने तो दस्तऐवज एखाद्या व्यक्तीस हस्तांतरित केला असून तिने जो दस्तऐवज सद्भावपूर्वक व प्रतिफल देऊन घेतला असेल तेव्हा असे लगतपूर्वी उल्लेखिलेले हस्तांतरण जर विक्रयाच्या स्वरूपात असेल तर अप्राप्तमूल्य विक्रेत्याचा धारणाधिकार किंवा मार्गक्रमणांत अटकाव करण्याचा अधिकार विफल होतो, आणि असे लगतपूर्वी उल्लेखिलेले हस्तांतरण जर तारणाच्या किंवा अन्य मूल्यार्थ संक्रामणाच्या स्वरूपात असेल तर अप्राप्तमूल्य विक्रेत्याचा धारणाधिकार किंवा मार्गक्रमणात अटकाव करण्याचा अधिकार हस्तांतरितीच्या अधिकारांच्या अधीनतेनेच बजावला जाऊ शकतो.

(२) जेव्हा हस्तांतरण तारणाच्या स्वरूपात असेल तेव्हा, अप्राप्तमूल्य विक्रेत्यास तारणधारकाकडे अशी मागणी करता येईल की, तारणाद्वारे प्रतिभूत केलेली रक्कम तारणधारकाने प्रथमत: शक्य असेल तेथवर, क्रेत्याचा तारणधारकाच्या हातात असलेला अन्य कोणताही माल किंवा क्रेत्याविरुद्ध उपलब्ध असतील अशा क्रेत्याच्या अन्य कोणत्याही प्रतिभूती यांमधून फेडून घ्यावी.

धारणाधिकाराने किंवा मार्गक्रमणात अटकाव करण्याने विक्रय सर्वसाधारणपणे विखंडित होत नाही.

५४. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, अप्राप्तमूल्य विक्रेत्याने आपला धारणाधिकार किंवा मार्गक्रमणात अटकाव करण्याचा अधिकार नुसता वापरण्याने विक्रयाची संविदा विखंडित होत नाही.

(२) जेव्हा माल नाशवंत स्वरूपाचा असेल अथवा ज्याने आपला धारणाधिकार किंवा मार्गक्रमणात अटकाव करण्याचा अधिकार वापरलेला आहे असा अप्राप्तमूल्य विक्रेता मालाचा फेरविक्रय करण्याच्या आपल्या उद्देशाची क्रेत्यास नोटीस देईल तेव्हा, क्रेत्याने जर वाजवी अवधीत किंमत दिली नाही किंवा तिचे निविदान केले नाही तर, अप्राप्तमूल्य विक्रेत्याला वाजवी अवधीत मालाचा फेरविक्रय करता येईल आणि

मूळ क्रेत्याने केलेल्या संविदाभंगामुळे झालेल्या कोणत्याही हानीबद्दल त्याच्याकडून नुकसानी वसूल करता येईल, पण फेरविक्रय केला असता होणाऱ्या कोणत्याही नफ्यावर क्रेत्याचा हक्क असणार नाही. जर अशी नोटीस देण्यात आली नाही तर, अप्राप्तमूल्य विक्रेता अशी नुकसानी वसूल करण्याला हक्कदार असणार नाही आणि फेरविक्रय केला असता काही नफा झाल्यास त्यावर क्रेत्याचा हक्क असेल.

(३) आपला धारणाधिकार किंवा मार्गक्रमणात अटकाव करण्याचा अधिकार ज्याने वापरला आहे असा अप्राप्तमूल्य विक्रेता मालाचा फेरविक्रय करतो तेव्हा, मूळ विक्रेत्यास फेरविक्रयाची नोटीस देण्यात आली नसली तरीही या क्रेत्याला त्यावर मूळ क्रेत्यापेक्षा सबळ हक्क प्राप्त होतो.

(४) जेव्हा विक्रेता, क्रेत्याने कसूर केल्यास फेरविक्रय करण्याचा अधिकार व्यक्तपणे राखून ठेवतो आणि क्रेत्याने कसूर केली असता मालाचा फेरविक्रय करतो तेव्हा, त्याद्वारे मूळ विक्रय-संविदा विखंडित होते, पण नुकसानीसाठी विक्रेत्यास सांगता येईल अशा कोणत्याही मागणीहक्कास त्यामुळे बाध येत नाही.

## प्रकरण ६ वे

### संविदाभंगाबद्दल दावे

५५. (१) जेव्हा विक्रयाच्या संविदेअन्वये मालातील मालकीहक्क क्रेत्याकडे संक्रामित झालेला असेल आणि क्रेता संविदेच्या अटींनुसार त्या मालाची किंमत देण्याबाबत गैरपणे उपेक्षा करील किंवा त्यास नकार देईल तेव्हा, विक्रेत्यास मालाच्या किंमतीसाठी त्याच्यावर दावा लावता येईल. किंमतीसाठी दावा.

(२) जेव्हा विक्रयाच्या संविदेअन्वये कोणत्याही दिवशी सुपूर्दगी व्हावयाची असली तरी, किंमत विवक्षित दिवशी प्रदेय असेल आणि क्रेता अशी किंमत देण्याबाबत गैरपणे उपेक्षा करील किंवा त्यास नकार देईल तेव्हा, मालातील मालकीहक्क संक्रामित झालेला नसला आणि माल संविदेप्रीत्यर्थ विनियोजित करण्यात आलेला नसला तरीही, विक्रेत्यास किंमतीसाठी त्याच्यावर दावा लावता येईल.

५६. जेव्हा क्रेता मालाचा स्वीकार करण्याबाबत आणि त्याची किंमत देण्याबाबत गैरपणे उपेक्षा करील किंवा त्यास नकार देईल तेव्हा, अस्वीकाराबद्दल नुकसानी मिळण्यासाठी विक्रेत्यास त्याच्यावर दावा लावता येईल. अस्वीकाराबद्दल नुकसानी.

५७. जेव्हा विक्रेता क्रेत्याकडे माल सुपूर्द करण्याबाबत गैरपणे उपेक्षा करील किंवा त्यास नकार देईल तेव्हा सुपूर्दगी न केल्याबद्दल नुकसानीसाठी विक्रेत्यास त्याच्यावर दावा लावता येईल. सुपूर्दगी न केल्याबद्दल नुकसानी.

५८. 'विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १८७७' (१८७७ चा १) प्रकरण २ रे याच्या उप-बंधांच्या अधीनतेने, विनिर्दिष्ट किंवा विनिश्चित मालाची सुपूर्दगी करण्याच्या संविदेचा भंग केल्याबद्दल लावलेल्या कोणत्याही दाव्यात, वादीच्या अर्जावरून न्यायालय, त्यास योग्य वाटल्यास, तो माल नुकसानी देऊन ठेवून घेण्याचा विकल्प प्रतिवादीला न देता, संविदेचे यथाविनिर्दिष्ट पालन करण्यात यावे असा आपल्या हुकूमनाम्याद्वारे निदेश देऊ शकेल. हुकूमनामा बिनशर्त असू शकेल, अथवा नुकसानी, किंमतीचे प्रदान किंवा अन्य गोष्टी यांबाबत न्यायालयाला न्याय्य वाटेल अशा अटींवर व शर्तींवर दिला जाऊ शकेल, आणि हुकूमनामा केला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी वादीस अर्ज करता येईल. विनिर्दिष्ट पालन.

५९. (१) जेव्हा विक्रेत्याने प्राश्वासनाचा भंग केलेला असतो किंवा जेव्हा क्रेता विक्रेत्याने पालन करावयाच्या शर्तीचा कोणताही भंग हा प्राश्वासनाचा भंग आहे असे समजून चालण्याचा पर्याय स्वीकारतो किंवा तसे करणे त्यास भाग पडते तेव्हा, प्राश्वासनाचा अशा प्रकारे भंग झाला एवढ्याच कारणाने क्रेत्याला माल नाकारण्याचा हक्क मिळत नाही; पण त्यास— प्राश्वासनाच्या भंगाबद्दल उपाय.

(क) प्राश्वासनाचा भंग झाल्याचे कारण किंमतीमध्ये घट करण्यासाठी किंवा तिला फाटा देण्यासाठी विक्रेत्याविरुद्ध पुढे करता येईल; किंवा

(ख) प्राश्वासनाच्या भंगाबद्दल नुकसानी मिळण्यासाठी विक्रेत्यावर दावा लावता येईल.

(२) किंमतीमध्ये घट करण्यासाठी किंवा तिला फाटा देण्यासाठी क्रेत्याने प्राश्वासनाचा भंग झाल्याचे कारण पुढे केले आहे ही वस्तुस्थिती त्याला आणखी नुकसान सोसावे लागले असेल तर त्याच प्राश्वासन भंगाबद्दल दावा लावण्यास त्याला प्रतिबंध ठरत नाही.

६०. जेव्हा विक्रय-संविदेतील कोणताही पक्ष सुपूर्दगीच्या दिनांकापूर्वी संविदा प्रत्यादिष्ट करतो तेव्हा अन्य पक्षास एकतर ती संविदा विद्यमान असल्याचे समजता येईल आणि सुपूर्दगीच्या दिनांकापर्यंत वाट पाहता येईल, किंवा त्यास ती संविदा विखंडित म्हणून समजता येईल आणि भंगाबद्दल नुकसानी मिळण्यासाठी दावा लावता येईल. नियत दिनांकापूर्वी संविदेचा प्रत्यादेश.

६१. (१) जेथे विधितः व्याज किंवा विशेष नुकसानी वसूल करण्याजोगी असेल अशा कोणत्याही प्रकरणी, व्याज किंवा विशेष नुकसानी वसूल करण्याच्या, किंवा दिलेले पैसे ते, दिल्याबद्दलचे प्रतिफल निष्फळ झाले असेल त्याबाबतीत वसूल करण्याच्या विक्रेत्याच्या किंवा क्रेत्याच्या अधिकारावर या अधिनियमातील कोणत्याही गोष्टींचा परिणाम होणार नाही. नुकसानीच्या रूपाने व्याज व विशेष नुकसानी.

(२) विरुद्ध संविदा नसल्यास,—

(क) विक्रेत्याने किंमतीच्या रकमेसाठी लावलेल्या दाव्यात त्याला—मालाच्या निविदानाच्या दिनांकापासून किंवा किंमत प्रदेय होती त्या दिनांकापासून;

(ख) विक्रेत्याच्या पक्षी संविदाभंग झाला असेल त्या बाबतीत, क्रेत्याने किंमतीच्या परताव्या-साठी लावलेल्या दाव्यात त्याला—किंमत दिली त्या दिनांकापासून,

त्या किंमतीच्या रकमेवर, न्यायालय त्यास योग्य वाटेल अशा दराने व्याज देवबू शकेल.

## प्रकरण ७ वे

### संकीर्ण

उपलक्षित अटी व शर्ती वगळणे.

६२. जेव्हा विक्रय-संविदेअन्वये विधिकल्पित उपलक्षणेने कोणताही अधिकार, कर्तव्य किंवा दायित्व उद्भवण्यासारखे असेल तेव्हा, पक्षांमधील व्यक्त कराराद्वारे किंवा व्यवहारक्रमाद्वारे अथवा ज्यायोगे संविदेतील उभय पक्ष बांधले जातील असा परिपाठ असेल तर त्या परिपाठाद्वारे ते निष्परिणामक करता येईल किंवा त्यात बदल करता येईल.

वाजवी अवधी हा वस्तुस्थितिविषयक प्रश्न.

६३. जेथे या अधिनियमात वाजवी अवधीसंबंधी कोणताही निर्देश करण्यात आला आहे तेथे, वाजवी अवधी म्हणजे काय हा वस्तुस्थितिविषयक प्रश्न ठरतो.

लिलाव-विक्रय.

६४. लिलावाद्वारे करावयाच्या विक्रयाच्या बाबतीत—

(१) माल विक्र्यासाठी लाटवार ठेवला असेल तेव्हा असा प्रत्येक लाट अलग अलग विक्रय-संविदेचा विषय असल्याचे सकृतदर्शनी मानले जाते;

(२) मालाचा विक्रय पूर्ण झाल्याचे लिलावकार जेव्हा हातोड्याच्या ठोक्याने किंवा अन्य रुढ रीतीने घोषित करतो तेव्हा तो पूर्ण होईल; आणि, असे जाहीर होईतोपर्यंत कोणत्याही बोलीदारास आपली बोली मागे घेता येईल;

(३) बोली बोलण्याचा अधिकार विक्रेत्यास किंवा त्याच्या वतीने व्यक्तपणे राखून ठेवता येईल आणि, जेव्हा असा अधिकार अशा रीतीने व्यक्तपणे राखून ठेवण्यात आला असेल,—पण अन्यथा नव्हे—तेव्हा विक्रेत्यास किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीस, यात यापुढे अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, लिलावात बोली बोलता येईल;

(४) विक्रय हा विक्रेत्याच्या वतीने बोली बोलण्याच्या अधिकारास अधीन असल्याचे जाहीर करण्यात आले नसेल तेव्हा, विक्रेत्याने अशा विक्र्याच्या वेळी स्वत: बोली बोलणे किंवा बोली बोलण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस नेमणे अथवा लिलावकाराने जाणूनबुजून विक्रेत्याकडून किंवा अशा कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही बोली घेणे कायदेशीर होणार नाही; आणि या नियमाचे व्यतिक्रमण करणारा कोणताही विक्रय कपटपूर्ण आहे असे क्रेत्यास समजता येईल.

(५) विक्रय राखीव किंवा हातच्या किंमतीस अधीन असल्याचे जाहीर करता येईल ;

(६) जर विक्रेत्याने किंमत चढवण्यासाठी कृतक बोलीचा उपयोग केला तर विक्रय क्रेत्याच्या विकल्पानुसार शून्यकरणीय असतो.

विक्रय-संविदांमध्ये, वाढलेल्या किंवा विक्रयाची किंवा क्रयाची घटविलेल्या बंद न करता करांची रक्कम मालाचा मिळवावयाची किंवा वजा करावयाची.

[1][६४क. (१) संविदेच्या अटीवरून भिन्न उद्देश दिसून येत नसेल तर, कोणत्याही मालाच्या किंवा क्रयाची कोणतीही संविदा करण्याच्या वेळी कर बसवलेला नसेल त्याबाबतीत, कर देण्याचा ती संविदा करण्यात आल्यानंतर अथवा ती करण्याच्या वेळी कर बसवलेला असेल त्याबाबतीत, दसकर विक्रय किंवा क्रय करण्याची संविदा करण्यात आल्यानंतर, अशा मालाबाबत पोट-कलम (२) मध्ये वर्णन केलेल्या स्वरूपाचा कोणताही कर बसवला, वाढवला, घटवला किंवा माफ केला गेल्यास,—

(क) जर याप्रमाणे तो बसवणे किंवा वाढवणे अशा प्रकारे परिणामक झाले की, त्यायोगे प्रकरणपरत्वे, तो कर किंवा वाढीव कर किंवा अशा कराचा कोणताही भाग दिला जातो किंवा प्रदेय होतो, तर विक्रेत्यास अशा कराच्या किंवा करातील वाढीच्या बाबतीत दिलेल्या किंवा प्रदेय असणाऱ्या रकमेइतका होईल एवढा अंश संविदा-किंमतीत मिळवता येईल, आणि तो अशी मिळवलेली रक्कम चुकती करून घेण्याला आणि तीसाठी दावा लावून ती वसूल करण्याला हक्कदार असेल; आणि

(ख) जर अशी घट किंवा माफी अशा प्रकारे परिणामकारक झाली की त्यायोगे, प्रकरणपरत्वे केवळ घटवलेला कर दिला जातो किंवा प्रदेय होतो किंवा कोणताही कर दिला जात नाही किंवा प्रदेय होत नाही, तर क्रेत्यास कराच्या घटीइतके किंवा माफ केलेल्या कराइतका होईल एवढा अंश संविदा-किंमतीतून वजा करता येईल, आणि तो अशी वजातीची रक्कम चुकती करण्यास किंवा तिच्याकरता किंवा तिच्याबाबत दावा लावला जाण्यास दायी असणार नाही.

---

१. १९४० चा अधिनियम ४१, कलम २ द्वारे कलम ६४क घालण्यात आले होते व आता १९६३ चा अधिनियम ३३, कलम ५ द्वारे त्याऐवजी नवीन कलम घातले.

(२) पोटकलम (१) चे उपबंध पुढील करांना लागू आहेत, ते असे---

(क) मालावरील कोणतेही सीमाशुल्क किंवा उत्पादनशुल्क;

(ख) मालाच्या विक्र्यांवरील किंवा क्रयांवरील कोणताही कर.]

६५. (निरसित) 'निरसन अधिनियम, १९३८' (१९३८ चा १)---कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

६६. (१) या अधिनियमातील किंवा त्याद्वारे झालेल्या कोणत्याही निरसनातील कोणत्याही व्याबृत्ती गोष्टीमुळे,---

(क) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच संपादित किंवा उपार्जित झालेला कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, ओढवलेले आबंधन किंवा दायित्व; अथवा

(ख) असा कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, आबंधन किंवा दायित्व यांच्याबाबतची कोणतीही वैधिक कार्यवाही किंवा उपाय; अथवा

(ग) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली किंवा राहिलेली कोणतीही गोष्ट; अथवा

(घ) या अधिनियमाद्वारे व्यक्तपणे निरसित केली नसेल अशी माल-विक्रयासंबंधीची कोणतीही अधिनियमिती; अथवा

(ङ) या अधिनियमाशी विसंगत नसलेला कोणताही विधिनियम,

यांवर परिणाम होणार नाही किंवा परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

(२) माल-विक्रयाच्या संविदांशी संबंधित असलेले दिवाळखोरीचे नियम, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी त्यांना लागू असण्याचे चालू राहील.

(३) विक्रय-संविदेच्या स्वरूपातील जो संव्यवहार गहाण, तारण, प्रभार किंवा अन्य प्रतिभूती म्हणून कार्यान्वित व्हावा असा त्यामागे उद्देश असतो अशा कोणत्याही संव्यवहारास या अधिनियमाचे विक्रय-संविदेशी संबंधित असलेले उपबंध लागू नाहीत.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई